(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई उच्च न्यायालय**

**नागपूर खंडपीठ, नागपूर**

**रिट याचिका क्र ५२२६/२०२२**

मेसर्स राजेश्वरी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स,
हि भागीदारी संस्था यांच्यामार्फत
भागीदार-श्री नरेंद्र विश्रामजी दुधे,
ज्यांचे कार्यालय २८९ 'राजेश्वरी' येथे आहे
आणि श्री मंगेश एस. सरावर,
मंदिर बाजार, सीताबर्डी , नागपूर,
तहसील आणि जिल्हा-नागपूर, (महाराष्ट्र राज्य) .... **याचिकाकर्ते**

**- विरुद्ध -**

१. राममूर्ती भीमसेन चावला,
राहणार प्लॉट क्रमांक ६०, गायत्री नगर,
बाबा फरीद नगर च्या बाजूला , कोराडी रोड,
नागपूर, जिल्हा. नागपूर
(दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या आदेशानुसार सुधारित)

२. देवीदास महादेव मास्के,
वय -सज्ञान , व्यवसाय- माहिती नाही ,
राहणार माता मंदिर, बस्तरवाडी,

इतवारी रेल्वे स्थानकाजवळ,

नागपूर, तहसील आणि जिल्हा-नागपूर (महाराष्ट्र राज्य) **....उत्तरवादीं**

---

श्री. अभिजीत खरे, याचिकाकर्त्याचे वकील

श्री. एन. बी. बर्गट , उत्तरवादी क्रमांक १ यांचे वकील

---

**न्यायमंच : न्यायमूर्ति श्रीमती. एम. एस. जवळकर**

**दिनांक : १४/०१/२०२५**

**मौखिक न्यायनिर्णय**

(१ ) न्यादेश. न्यादेश त्वरित बजावून परत येण्याजोगा केला.

(२ ) दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले.

(३) १८ व्या दिवाणी सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर, नागपूर यांनी एम. जे. सी. क्र. १९६/२०२१ मध्ये प्रदर्श १ च्या खाली पारित केलेल्या दिनांक २०/१०/२०२१ रोजीच्या आदेशाला आव्हान देणारी सध्याची याचिका दाखल करण्यात आली आहे.

(४) उत्तरवादी क्रमांक १ म्हणजे एम. जे. सी. क्रमांक १९६/२०२१ मधील अर्जदार यांनी विशेष दिवाणी दावा क्रमांक ९५६/२०११ दाखल केला आहे आणि उक्त दावा दिनांक ३१/०१/२०१७ रोजी कसूर केल्याने फेटाळण्यात आला. विलंब माफ करण्याच्या अर्जामध्ये विद्वान न्यायचौकशी न्यायालयासमोर अर्जदार यांनी असा युक्तिवाद केला आहे की त्याच्या वकिलाने कसूर झाल्याने दावा रद्द करण्याबाबत माहिती दिली नाही

आणि चौकशीनंतर सप्टेंबर २०२० मध्ये त्यांच्या वकिलासह त्यांना सांगण्यात आले की दावा फेटाळण्यात आला आहे. सप्टेंबर २०२० पर्यंत, त्यांचा असा प्रामाणिक विश्वास होता की वकील हे प्रकरण विद्वान दिवाणी न्यायालयासमोर योग्य प्रकारे आणि कार्यतत्परतेने चालवत आहेत. त्यानंतर त्यांनी प्रमाणित प्रतीसाठी अर्ज केला आणि वैद्यकीय प्रमाणपत्रासह विलंब माफ करण्यासाठी अर्ज दाखल केला. तो शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती आहे आणि त्याच्या हृदयाची एक मोठी शस्त्रक्रिया केली आहे, असा त्याचा युक्तिवाद आहे. कोविड-१९ महामारीमुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम झाल्याचेही त्यांनी सादर केले आहे. असे दिसते की अर्जासह दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे आणि निवेदनाच्या आधारे, एम. जे. सी. क्रमांक १९६/२०२१ मंजूर करण्यात आली आणि पूर्ववत करण्याचा अर्ज दाखल करण्यास होणारा विलंब माफ करण्यात आला.

(५) याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिल यांनी सांगितले की, प्रत्यक्षात पाच वर्षांचा विलंब आहे, परंतु कोविड महामारीचे दिवस वजा केल्यावर, विलंब १४७३ दिवसांचा आहे. तथापि, विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने याचा विचार केलेला नाही. असे दिसते की आक्षेपित आदेशाच्या अंतिम परिच्छेदात,विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की एम. जे. सी. आधीच दाखल झाली आहे आणि पक्षकारांना विशेष दिवाणी दावा क्र. ९५६/२०११ पूर्ववत करण्यासाठी पुरावा सादर

करण्याचे स्वातंत्र्य आहे. अभिलेखावरून असेही दिसून येते की अर्जदाराने विलंब माफ करण्यासाठी अर्ज आधीच दाखल केला आहे आणि अनेक कागदपत्रांवर अवलंबून असल्याचे नमूद करून अर्जदाराने एक पुर्सिस दाखल केला आहे. दाव्यातील विलंबासाठीचे आणि पूर्ववत करण्यासाठीचे कारण एकच आहे, म्हणून पूर्ववत करण्याच्या अर्जासाठी प्रतिज्ञापत्रावरील पूर्ववत करण्याच्या अर्जासह कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत . पूर्ववत करण्याच्या अर्जाच्या मुद्द्यावर अर्जदाराला आणखी कोणताही पुरावा सादर करायचा नाही, असेही उक्त पुर्सिसमध्ये नमूद करण्यात आले आहे. अभिलेखावरील रोझनाम्याच्या (पृष्ठ १००) वरून असे दिसते की त्याच दिवशी विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने हे प्रकरण गैरअर्जदार यांच्या पुराव्यासाठी दिनांक ०९/१०/२०२१ रोजी ठेवले केले. दिनांक ०९/१०/२०२१ रोजी अर्जदाराचे वकील उपस्थित होते, पण गैरअर्जदार यांचे वकील उपस्थित नव्हते आणि म्हणून हे प्रकरण दिनांक १२/१०/२०२१ रोजी ठेण्यात आले. दिनांक १२/१०/२०२१ रोजी हे प्रकरण युक्तिवादासाठी दिनांक २०/१०/२०२१ रोजी ठेवण्यात आले होते. दिनांक २०/१०/२०२१ रोजी आक्षेपित आदेश पारित करण्यात आला. विलंब माफ करण्याच्या अर्जावर, म्हणजे एम. जे. सी. क्र. १९६/२०२१ मध्ये पारित केलेल्या दिनांक ०४/१०/२०२१ रोजीच्या आदेशात, तोच एम. जे. सी. क्रमांक पूर्ववत करण्यासाठीच्या दिनांक २०/१०/२०२१ रोजीच्या आदेशात दिसत आहे. खरे तर, पूर्ववत करण्याचा अर्ज

दाखल करण्यास विलंब माफ  झाल्यानंतर,पूर्ववत करण्याचा अर्ज स्वतंत्रपणे नोंदवला गेला पाहिजे होता, तथापि, असे दिसते की  पूर्ववत करण्याचा  अर्जाला वेगळा नोंदणी क्रमांक नाही किंवा  पूर्ववत करण्यासाठीच्या अर्जाच्या अशा नोंदणीची कोणतीही सूचना गैरअर्जदार यांना  देण्यात आली नव्हती. जरी विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने आक्षेपित  आदेशात असे निरीक्षण नोंदवले होते की वादी आणि त्याच्या वकिलांवर हजर राहणे आणि योग्य पावले उचलत प्रकरण चालवणे हे दोन्ही कर्तव्य आहे, तथापि, त्यांनी पुढे असे निरीक्षण नोंदवले गेले की वादी यांनी  त्याच्या मुलाने प्रमाणित प्रत मिळवल्यानंतरच दावा फेटाळण्यात आल्याची  वस्तुस्थिती शोधून काढली. पर्यटनाच्या व्यवसायाबद्दलच्या काही तथ्यांचेही विद्वान न्यायालयाकडून योग्य अधिमूल्यन  केले गेले नाही. वस्तुस्थिती अशी आहे की पूर्ववत करण्याचा  अर्ज स्वतंत्रपणे दाखल  न करता, विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने  आदेश पारित केला ज्यामुळे गैरअर्जदार  म्हणजे विद्यमान याचिकाकर्त्याला पूर्ववत करण्याच्या अर्जात  प्रभावीपणे सहभागी होण्यापासून किंवा त्याला विरोध करण्यापासून वंचित ठेवले गेले. अर्जदार- वादी यांच्या वकिलाने माहिती न दिल्याने ३  वर्षे आणि १०  महिन्यांचा विलंब झाल्याचा आरोप आहे. तथापि, त्याच्या वकिलाकडून त्याच्या दाव्याची स्थिती माहिती करण्यासाठी त्याने किती कार्यतत्परता दाखविली  आहे हे दाखवण्यासाठी अभिलेखावर  काहीही नाही. त्याने त्याच्या वकिलाविरुद्ध कोणती पावले उचलली आहेत हे देखील अभिलेखावर  नाही.

(६ ) माझ्या मते, पूर्ववत करण्यासाठीचा अर्ज दाखल करण्यात झालेला विलंब खूप मोठा होता. अर्जदार , त्याच्या वकिलाने माहित न दिल्याबद्दल किंवा त्याच्या शारीरिक अपंगत्वाबद्दल किंवा हृदयरोगाबद्दल ह्या त्याच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ , साक्षीदाराच्या पिंजऱ्यात आला नाही. दावा पूर्ववत करण्यासाठीचा अर्ज दाखल करण्यात होणारा मोठा विलंब लक्षात घेता, जो सुमारे ३ वर्षे आणि १० महिन्यांचा विलंब आहे. विद्वान सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्याकडून अर्जदारांना पुरावा सादर करण्याचे निर्देश देणे अपेक्षित होते आणि जर त्याने दाखल केलेल्या दस्तऐवजावर पुरावा देण्यास नकार दिला तर असे मत व्यक्त करावयाचे होते की ते आपला दावा सिद्ध करण्यात अपयशी ठरले. त्याला विरोध करण्याची संधी दिल्याशिवाय, अर्जदार यांनी दस्तऐवज सिद्ध केले असे धरले जाऊ शकत नाही . न्यायालयाने कायद्याची अंमलबजावणी केली पाहिजे आणि समता आणि निःपक्षपातीपणा सुनिश्चित केला पाहिजे. त्याच एम. जे. सी. मध्ये पूर्ववत करण्याच्या अर्ज स्वतंत्रपणे दाखल केल्याशिवाय, पूर्ववत करण्याचा आदेश हा विद्यमान याचिकाकर्त्याला म्हणजेच गैरअर्जदार यांना नोटीस न देता पारित करण्यात आला, ही विद्वान दिवाणी सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या बाजूनेही गंभीर चूक आहे. विद्वान दिवाणी सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर हे गैरअर्जदार यांना सहभागी होण्यापासून आणि कार्यवाहीचा बचाव करण्यापासून वंचित ठेवून आपली कर्तव्ये पार पाडण्यात अयशस्वी ठरले .

त्यामुळे एम. जे. सी. क्रमांक १९६/२०२१ मधील दिनांक ०४/१०/२०२१ आणि दिनांक २०/१०/२०२१ रोजीचे दोन्ही आदेश रद्दबातल होण्यास पात्र आहेत. हे खरे आहे की तो वृद्ध व्यक्ती आहे आणि त्याला काही आजार आहेत , तथापि, प्रतिवादींना त्या कागदपत्रांचा किंवा विलंब किंवा पूर्ववत करण्याच्या अर्जासाठी अर्जदाराने केलेल्या निवेदनांना विरोध करण्याची संधी दिली नाही.

(७ ) अशा प्रकारे, मी खालील आदेश पारित करण्यासाठी पुढे जाते :

<u>**आदेश**</u>

(i) रिट याचिका मंजूर करण्यात येते.

(ii) १८वे दिवाणी सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर, नागपूर यांनी एम जे सी क्र १९६/२०२१ मधील प्रदर्श १ खालील दिनांक ०४/१०/२०२१ रोजीचा आदेश आणि एम जे सी क्र १९६/२०२१ मधील अभिकथितपणे पारित केलेला प्रदर्श १ खालील दिनांक २०/१०/२०२१ रोजीचा आदेश यान्द्वारे रद्दबातल करण्यात येतो .

(iii) मोठा विलंब लक्षात घेता, १८ वे दिवाणी सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर, नागपूर यांना पक्षकारांना पुरावे सादर करण्याचे निर्देश देण्याचे निर्देश दिले जातात. एम. जे. सी. क्रमांक १९६/२०२१ मध्ये प्रदर्श १ खाली आदेश दिल्यानंतर, जर विलंब माफ केला जाईल, तर पूर्ववत करण्यासाठी एम. जे. सी. ची स्वतंत्रपणे नोंदणी करण्यासाठी रजिस्ट्रीला निर्देश द्यावे आणि उत्तरवादी यांना नोटीसची बजावणी करावी.

(iv) १८ वे दिवाणी सहन्यायाधीश वरिष्ठ स्तर, नागपूर यांना एम. जे. सी. क्रमांक १९६/२०२१ हे चा दोन महिन्यांत निकाली लावण्याचे निर्देश देण्यात येत आहेत आणि जर विलंब माफ केला गेला तर स्वतंत्रपणे नोंदणीकृत केलेली पूर्ववत करण्यासाठीची एम. जे. सी. त्यानंतर दोन महिन्याच्या आत निकाली लावावी.

(v) तोपर्यंत पक्षकार चालूस्थिती कायम ठेवतील.

प्रलंबित अर्ज, जर असतील तर, त्या निकाली लावण्यात येतात.

( **न्यायमूर्ति श्रीमती. एम. एस. जवळकर** )

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."